**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**सोमवार दिनांक २५ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नागपूरचे उद्योगपती सत्यनारायण नुवाल आणि गुरुकुंज मोझरी इथल्या जनार्दन बोथे गुरुजी यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान.**
2. **आंतरराष्ट्रीय स्तरावर भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे अर्थव्यवस्थेला आव्हानं निर्माण होत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन.**
3. **गेल्या १५ मे पासून पेट्रोल आणि डिझेलची चौथ्यांदा दरवाढ, काँग्रेस पक्षाची सरकारवर टीका.**
4. **२७ मे पासून विदर्भातील काही भागांत हलक्या मान्सूनपूर्व पावसाची शक्यता.**

-----------------------------------

पद्म पुरस्कार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अनुयायी, अमरावती जिल्ह्यातील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांतील लोकांच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित करणारे समाजसेवक जनार्दन बापूराव बोथे यांना आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. आपला हा पुरस्कार तुकडोजी महाराजांच्या विचारांना समर्पित असल्याची भावना बोथे गुरुजी यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली......

***(होल्ड बाईट - बोथे गुरुजी ३० सेकंद)***

नागपूरचे उद्योगपती, समाजसेवक आणि 'ऑपरेशन सिंदूर'साठी शस्त्रास्त्र निर्मिती करणाऱ्या Solar Defence and Aerospace Limited चे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांनाही आज पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. आज राष्ट्रपती भवन इथं आयोजित पद्म पुरस्कार वितरण समारंभात उपराष्ट्रपती सी पी राधा कृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. यावेळी एकूण ६६ जणांना पद्म पुरस्कारांनी गौरविण्यात आलं . त्यामध्ये २ पद्मविभूषण, ६ पद्मभूषण आणि ५८ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. उर्वरित पुरस्कार दुसऱ्या टप्प्यात प्रदान करण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातून यंदा १५ जणांची पद्म पुरस्कारांसाठी निवड झाली आहे.

-----------------------------------

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन

देशाची अर्थव्यवस्था अंतर्गत पातळीवर मजबूत आहे, मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर भूराजकीय आणि आर्थिक संघर्षामुळे नवनवी आव्हानं निर्माण होत आहेत असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सिडबी म्हणजे स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया च्या ३७व्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विशेषतः पश्चिम आशियातला संघर्ष पेटल्यानंतर खतं, सोनं, इंधन या सर्व उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय बाजारातले दर कडाडले असून त्यामुळे देशाच्या परकीय चलनसाठ्यावर ताण येतो. अशा परिस्थितीत सोनं खरेदी करु नये, खतांचा वापर कमी करावा, इंधनाची काटकसर करावी, परदेशप्रवास शक्यतो करु नये अशी आवाहनं प्रधानमंत्र्यांनी जनतेला केली आहेत. त्याबाबत विरोधक अपप्रचार करत असल्याचं त्या म्हणाल्या….

***(होल्ड बाईट- सीतारामन)***

-----------------------------------

दरवाढ/राहुल गांधी टीका/विजय वडेट्टीवार

पेट्रोल आणि डिझेलचे दर आज अनुक्रमे २ रुपये ६१ पैसे आणि २ रुपये ७१ पैशांनी वाढले. गेल्या दोन आठवड्यातली पेट्रोल-डिझेलची ही चौथी दरवाढ आहे. या वाढीनंतर मुंबईत पेट्रोलचे दर १११ रुपये २१ पैसे प्रति लिटर तर डिझेलचे दर ९७ रुपये ८३ पैसे प्रति लिटर झाले आहेत. १५ मे पासून आजपर्यंत चारदा पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ झाली असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ७ रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. एप्रिल २०२२ नंतरची ही सर्वात मोठी वाढ आहे. महिन्याभरात चौथ्यांदा झालेल्या इंधन दरवाढीबद्दल लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारच्या धोरणांमुळे इंधन दरवाढ होत असल्याची टीका केली आहे. कापूस, कांदा आणि धान उत्पादक शेतकरी संकटात असून हमीभाव मिळत नसल्याचंही वडेट्टीवार म्हणाले. विधान परिषद निवडणुकीत पैशांचा वापर होत असल्याचा आरोप करत पक्षादेश मोडणाऱ्यांवर कारवाईचा इशारा त्यांनी दिला आहे. पेट्रोल दरवाढीवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील सरकारवर टीका केली आहे. इराण युद्धाच्या नावाखाली केलेली ही दरवाढ आधीच महागाईने पिचलेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या खिशावर दरोडा टाकणारी असून सरकारने

तात्काळ मागे घ्यावी आणि महागाई नियंत्रणात ठेवता येत नसेल तर नरेंद्र मोदींनी खुर्ची सोडावी, अशी मागणी त्यांनी केली.

-----------------------------------

नीट परीक्षा-सर्वोच्च न्यायालय

सर्वोच्च न्यायालयानं आज नीट परीक्षेतील वारंवार होणाऱ्या त्रुटींवर नाराजी व्यक्त केली. पेपरफुटीच्या आधीच्या घटनांतून राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात NTA नं कोणताही धडा घेतलेला नाही, ही दुर्दैवी बाब असल्याचं न्यायालयानं म्हटलं आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि आलोक अराधे यांच्या पीठानं केंद्र सरकार, NTA आणि CBI ला नोटीस बजावत याप्रकरणी स्पष्टीकरण मागवलं आहे. तसंच, NTAच्या कामकाजातील सुधारणांबाबत माजी इस्रो प्रमुख के. राधाकृष्णन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी कशी झाली, याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, NTA नं या महिन्याच्या २८ तारखेला नियोजित असलेली विद्यापीठ सामायिक प्रवेश परीक्षा पुढं ढकलली आहे. सरकारनं बकरी ईदची सुट्टी २८ तारखेला जाहीर केली, त्यामुळं हा बदल केला आहे. या परीक्षेच्या उमेदवारांसाठी सुधारित तारीख लवकरच जाहीर केली जाईल.

-----------------------------------

प्रतिनिधी नोंदणी

१९ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी माध्यम प्रतिनिधी नोंदणी सुरु झाली आहे. मुंबई इथं १५ ते २१ जून दरम्यान या चित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या या द्विवार्षिक महोत्सवात प्रामुख्यानं माहितीपट, लघुकथापट आणि ॲनिमेशन अशा 'नॉन-फीचर' फिल्मचा समावेश असतो.'सर्वोत्कृष्ट माहितीपटा'साठी १० लाख रुपयांचा 'सुवर्ण शंख पुरस्कार' दिला जातो.

-----------------------------------

विकास ठाकरे

नागपुरातील वाढत्या वीज संकटाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विकास ठाकरे यांनी महावितरणच्या मुख्य अभियंत्यांना निवेदन देत पश्चिम नागपुरात तात्काळ २४x७ अखंडित वीज पुरवठ्याची मागणी केली आहे. झिरो लोडशेडिंगच्या नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारले जात असताना नागरिकांना वारंवार वीज खंडित होण्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. झिंगाबाई टाकळी, दाभा, गिट्टीखदान, सदर, रविनगर, अंबाझरी, फुटाळा आदी भागांमध्ये दिवस-रात्र वीज

पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.  या विरोधात काँग्रेसच्या वतीने आज आंदोलन करण्यात आले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी महावितरण कार्यालयाबाहेर निदर्शने करत राज्य सरकार आणि वीज विभागाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शहरातील वीज व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून प्रशासन आणि सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे, असा आरोप ठाकरे यांनी केला.  वीज कपात तात्काळ थांबवली नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

-----------------------------------

प्रारूप मतदार याद्या

यवतमाळ स्थानिक प्राधिकरण मतदार संघाच्या विधानपरिषद निवडणूक-२०२६ साठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या २३ मे रोजी जिल्हाधिकारी, तहसील, नगर परिषद आणि  पंचायत समिती कार्यालयांमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मतदार यादीवरील दावे आणि  हरकती २९ मेपर्यंत दाखल करता येणार असून अंतिम मतदार यादी ४ जून रोजी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश शिंगटे यांनी दिली.

-----------------------------------

बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी

वाशिम जिल्ह्यातल्या मालेगाव इथल्या माने रुग्णालयात बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी प्रकरणी रुग्णालयाचे संचालक माजी सरपंच डॉ. विवेक माने यांच्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या रुग्णालयात बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर प्रशासनानं सापळा रचून ही कारवाई केली.

-----------------------------------

कौटुंबिक वादातुन मृत्यू

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यात भालांजन गावाजवळील विहिरीत एकाच कुटुंबातील पाच जणांचे मृतदेह आढळून आले आहे. मृतांमध्ये ३५ वर्षीय विजय किराडिया आणि त्यांच्या चार लहान मुलांचा समावेश असून प्राथमिक माहितीनुसार ही घटना कौटुंबिक वादातून घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. जळगाव जामोद पोलिस आणि न्यायवैद्यक पथकाने घटनास्थळी पाहणी करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवले असून पुढील तपास सुरू आहे.

-----------------------------------

हवामान

विदर्भात पुढील तीन दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असून अमरावती आणि पश्चिम विदर्भात कमाल तापमान ४५ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. २७ आणि २८ मेपासून विदर्भातील काही भागांत हलक्या मान्सूनपूर्व पावसाची शक्यता असून तापमानात २ ते ४ अंशांनी घट होऊ शकते. अमरावती-अकोला परिसरात २९ आणि ३० मे रोजी तुरळक पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मान्सून अरबी समुद्राच्या दक्षिण भागात तसेच मध्यपूर्व बंगालच्या उपसागरात पोहोचला असून ३० मेपूर्वी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. विदर्भातील ब्रह्मपुरी इथं आज सर्वाधिक 46.6 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ गडचिरोली इथं 46.2; चंद्रपूर आणि नागपूर इथं 45.6; अकोला इथं 44 आणि गोंदिया इथं 43 तर वर्धा इथं 42 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

-----------------------------------